# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा-२०१४

## - अंतिम निकाल –

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 27 जुलै, 2014 रोजी घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा 2014 च्या एकूण 1300 पदांचा अंतिम निकाल उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहून **दि. 6 जून, 2015 रोजी** जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेमधून मु. मुडगांव, लातूर येथील श्री.कुंभार नागनाथ आदिनाथ (PN004408) हे राज्यात प्रथम व मागासवर्गीयांमधूनही प्रथम आले आहेत. तसेच महिलांमध्ये तिंतरवणी, ता. शिरूर, बीड येथील श्रीमती नागरगोजे राधाबाई विष्णु (KD001331) ह्या प्रथम आल्या आहेत.

2. गुणवत्ताधारक खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकरिता शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस त्यांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी तपासण्याच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे.

3. लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) या पदासाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारस याद्या आयोगाच्या कुपरेज येथील कार्यालयातील सूचना फलकावर तसेच आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

4. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत आयोगाकडे online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांनी “उमेदवारांना सर्वसाधारण सूचना” मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

ठिकाण : मुंबई
दिनांक : 6 जून, 2015.

**विजया पडते**
**उपसचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**